लोकमत

# सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**अकोट :** नरसिंग विद्यालय येथे सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. कार्यक्रमात सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाइन गुन्हे कसे घडतात याविषयी मार्गदर्शन केले. कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला यांच्या सहकार्याने क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्य सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम साबू व उपक्रमाचे समन्वयक डॉ एच. जे. खरात यांच्य मार्गदर्शनाखाली पार पडली यामध्ये सायबर वॉरियर्स सुमित सपकाळ व अनिकेत भुडवे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य सचिन धांडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थ उपस्थित होते.

Hello Akola Gramin
Page No. 2 Aug 11, 2024
Powered by: erelego.com